दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

शनिवार दि.१ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत     संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१६७ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४


# शरद पवारांची शॅडो कॅबिनेट तयार: सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमावर ठेवणार लक्ष

## महाराष्ट्र पिंजून काढण्याचे दिले आदेश–शरद पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रात महायुतीचे सरकार प्रचंड बहुमताने स्थापन झाले व त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात १०० दिवसांच्या कार्यक्रमांचे नियोजन देखील करण्यात आले होते. शंभर दिवसांच्या कार्यक्रमाचा आढावा देखील गुरुवारी मुख्यमंत्र्यांनी घेतला. आता सरकारच्या या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून 'शॅडो कॅबिनेट'ची निर्मिती करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून शॅडो कॅबिनेट तयार करण्यात आली असून या माध्यमातून राज्य सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यात येणार आहे. तसेच पक्षाच्या नेत्यांवर विभागवार जबाबदारी देखील देण्यात आली आहे. या नेत्यांना संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढण्याचे आदेश शरद पवारांनी दिले आहेत. या संदर्भातील बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीला आमदार व खासदार उपस्थित होते.संपूर्ण महाराष्ट्र फिरून राज्य सरकारच्या शंभर दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यासाठी जयप्रकाश दांडेगावकर, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, रोहित पवार, एकनाथ खडसे, हर्षवर्धन पाटील यांच्यावर पक्षाने जबाबदारी दिली आहे. या नेत्यांनी प्रत्येक महिन्यात जिल्ह्यांचे दौरे करून आढावा घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच जास्तीत जास्त तरुण चेहऱ्यांना संधी देण्याची देखील रणनीती आखण्यात आली आहे. पदाधिकारी बदलायची गरज वाटत असेल तर पदाधिकारी देखील बदलण्यास सांगितले आहे.यावेळी शरद पवारांनी पक्षाच्या नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना नव्या उमेदीने कामाला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच पुढील तीन महिन्यात महाराष्ट्र पिंजून काढा आणि त्याचा अहवाल द्या, असे आदेश शरद पवारांनी या नेमलेल्या नेत्यांना दिले आहेत. या बैठकीनंतर खासदार अमोल कोल्हे यांनी याबद्दल माहिती दिली आहे.अमोल कोल्हे म्हणाले, शरद पवारांच्या पक्षाच्या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय झाले. त्यामध्ये सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमावर लक्ष ठेवणारी टास्क टीम तयार करण्यात आली. तसेच विभागनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले असून ७-८ मार्चपासून या नेत्यांना विभागनिहाय दौरे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्याच्या विरोधी पक्षनेतेपदाबाबत निर्णय हा महाविकास आघाडीच्या समन्वय समितीची बैठक होईल. या अधिवेशनात विरोधी पक्ष नेतेपदाबाबत जो प्रस्ताव दिला जाईल त्यावर सरकारनेही विचार करावा असा ठराव या बैठकीत मांडण्यात आला आहे.

शरद पवारांच्या शॅडो कॅबिनेटमध्ये कोणाला कोणती जबाबदारी?

मराठवाडा– राजेश टोपे आणि जयप्रकाश दांडेगांवकर.

विदर्भ– राजेंद्र शिंगणे आणि अनिल देशमुख.

कोकण– जितेंद्र आव्हाड आणि सुनिल भुसारा.

प. महाराष्ट्र– हर्षवर्धन पाटील .

उत्तर महाराष्ट्र– हर्षवर्धन पाटील.



## ओ.बी.सी.प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे जातप्रमाणपत्र पडताळणी करून मिळावे–मुखेड काँग्रेसची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**




मुखेड, तालुक्यातील ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करून तात्काळ द्या अशी मागणी मुखेड शहर काँग्रेसच्या वतीने तहसीलदार राजेश जाधव यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांना दिले.

ओ.बी.सी. प्रवगातील विद्यार्थ्यांचे व नौकरदार वर्गांनी जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करून मिळावे म्हणुन नांदेड जिल्हा जातप्रमाणपत्र पडताळणी समितीकडे रितसर ऑनलाईन अर्ज दाखल केलेले आहेत. प्रस्तावासोबत लागणारे पुरावेही जोडण्यात आलेले असताना समितीकडे जवळ जवळ जिल्हयातील २००० प्रस्ताव प्रलंबीत आहेत. पडताळणीच्या नावाखाली परीपुर्ण पडताळणी न करता प्रस्तावात कुठल्याही त्रुटी नसताना हेतुपुरस्पर शेकडो विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पोस्टाद्वारे परत टपाली पाठवीत आहेत. यामुळे विद्यार्थी व नोकरदार वर्गाचे नुकसान होत असुन शासना विविध गरजु लाभार्थ्यांनाही वेगवेगळ्या योजनेपासुन वंचीत राहावे लागत आहे. ओ.बी.सी. विद्यार्थी व नौकरदार वर्गाच्या जातीची प्रमाणपत्रे तात्काळ योग्य पडताळणी करून निकाली काढण्यात यावीत अन्यथा शहर काँग्रेस व सर्व सेलच्या विभागाकडून तालुक्यातील विद्यार्थ्यांसह जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेडच्या विरोधात तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव डॉ. श्रावण रॅपणवाड, ओ.बी.सी. नेते विश्वनाथ कोलमकर, शहर काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर, अण्णासाहेब जाहिरे,जयप्रकाश कानगुले,सुरेश पाटील बेळीकर, ओ.बी.सी. प्रकाश निमलवाड, सुनिल आरगिळे,विशाल गायकवाड, विठ्ठलराव पंदीलवाड, बालाजी वाडेकर,शिवाजी गायकवाड,केतन सावकार मामडे,ईमराण पठाण, विद्याधर साखरे, रामेश्वर पाटील सय्यद मुजीप, गौस सलगरकर, ईरफान मोमिन यांच्या स्वाक्षऱ्या व अनेकांची उपस्थिती होती.

## व्यंकटेश कृपा शुगर मिल्स लि. जातेगाव (बु) ता.शिरुर जि.पुणेच्या वतीने कवळे गुरूजींचा सत्कार संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जातेगाव । प्रतिनिधी**

नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोक कल्याणकारी शेतकरी नेते माननीय मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी व्यंकटेश कृपा शुगर मिल्स जातेगाव जि. पुणे येथे इथेनॉल निर्मिती प्रोजेक्टला भेट देऊन पाहणी करून इथेनॉल निर्मिती बद्दलचे बारकावे जाणून घेतले.यावेळी व्यंकटेश कृपा शुगर मिलचे चेअरमन श्री.संदिप तौर साहेब यांनी मारोतराव पाटील कवळे गुरुजी व गुरूजी चेजावई उत्कर्ष पाटील जाधव यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तसेच यांच्यासह श्री.बि.आर.सायकर (जनरल मॅनेजर) श्री.एम.बी.पवार (प्रोडक्शन मॅनेजर) श्री.टि.एन.निघुते (चिफ इंजिनियर), श्री.गोडगे सर (टेक्निकल अडवायझर वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट,पुणे) उपस्थित होते.

## खपराळा येथील अवैधरित्या मुरूम उत्खनाची चौकशी व जायमोक्यावर जाऊन ETS मोजणी करण्याची मागणी

### तहसीलदार यांना राष्ट्रीय पत्रकार संघ भारत संघटनेच्या वतीने निवेदन




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालूक्यातील मौजे खपराळा ता.बिलोली येथे गट क्रमांक २१९ क्षेत्रावर १७ फेब्रुवारी ते २५फेब्रुवारी पर्यंत नांदेड येथील गार्गी डेव्हलपर्स या कंपनीस २००ब्रास मुरुम काढण्याची परवानगी तहसील कार्यालयातून देण्यात आली परंतू या गूत्तेदारानी परवानगी दीलेल्या क्षेत्रावर मुरुम न काढता खपराळा आणि तोरणा या शेताक–याना शेतीकडे ये जा करण्यासाठी असलेल्या शिव रस्त्यावरच मोठ्या प्रमाणात रात्रंदिवस परवानगी पेक्षा जास्त मुरुम उत्खनन केले त्यामुळे रस्त्याच्या मधोमध मोठा खड्डा पडला आहे त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीकडे जाण्यासाठी ऐन हरभरा काढणीच्या वेळेस खड्ड्यांमुळे शेतातील हरभरा वाहतुक बंद झालेली आहे या संदर्भात तोरणा आणि खपराळा दोन्ही गावच्या शेतक–यांनी तहसिलदार यांना रीतसर निवेदनाद्वारे संबंधीत गूत्तेदाराची चौकशी करण्याची मागणी केली होती परंतु तहसील प्रशासन मुरुम. रेती आणि माती गुत्तेदारासोबत असलेल्या मधूर संबंधामुळे गूत्तेदाराची प्रशासनाकडुन चौकशी करण्याची मानसिकता दीसत नसल्याने शेतकऱ्यांनी न्यायासाठी राष्ट्रीय पत्रकार संघ भारत या संघटनेचे बिलोली तालूका अध्यक्ष ज्ञानेश्वर शीरगिरे यांच्यासोबत संपर्क साधला त्यामुळे राष्ट्रीय पत्रकार संघ भारतच्या वतीने तहसील कार्यालय बिलोली येथे अवैध मुरुम उत्खननाची तात्काळ ईटिएसद्वारे मोजणी करण्याची मागणी बिलोली तालूका अध्यक्ष ज्ञानेश्वर शिरगिरे , दयानंद भद्रे, विलास शेरे, गौतम वाघमारे यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

## उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी दिव्यांगाला दिले आश्वासन

### दिव्यांगांच्या शिष्टमंडळाने विमानतळावर अजित पवार यांची घेतली भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**



दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी संघटनेच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार हे नांदेड दौऱ्यावर आले असता त्यांना घेराव घालून निवेदन देण्याचा इशारा बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या वतीने प्रशासनाला दिला होता. परंतु प्रशासनाच्या वतीने मुख्य करून जिल्हा पोलिस प्रशासनाकडून दिव्यांग संघटनेची व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची विमानतळावर भेट घेऊन निवेदन दिले. त्यावेळी अजित दादा पवार यांनी दिव्यांगांच्या मागण्यांचा त्वरित विचार करून मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

सविस्तर वृत्त असे की राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार हे नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षप्रवेश मेळाव्यास आज आले असता विमानतळावरच बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीच्या वतीने त्यांना विविध मागण्यांसंदर्भात निवेदन देण्यात आले या निवेदनातील मागण्या म्हणजे १.आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गतचा दिव्यांगांचा राखीव निधी खर्च करून न घेणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी. २.राज्याच्या अर्थसंकल्पात दिव्यांगांसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात यावी. ३.संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्यात यावी. ४.स्थानिक स्वराज संस्था,नागरी स्वराज्य संस्थांमधील दिव्यांगांचा राखीव निधी खर्च न करणा–या दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी. ५.एस.टी बससह शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या बोगस दिव्यांगांवर कारवाई करण्यात यावी. ६.स्वयंरोजगाराठी दिव्यांगांना शासकीय गाळे व २०० स्क्वेअर फूट जागा देण्यात यावी. ७.मुकबधीर कर्णबधिर दिव्यांगांना चिन्हांकित वाहन परवाने देण्यात यावे. ८.दिव्यांग वित्त व विकास महामंडळाकडून दिव्यांगांना ५० टक्के सबसिडीच्या दरात कर्ज उपलब्ध करून द्यावे या व इतर मागण्यांचे निवेदन आज उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांना देण्यात आले व मागण्या त्वरित मान्य करून सोडविण्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आश्वासन दिले. यावेळी बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल साळवे.आदित्य पाटिल.पिंटु बद्देवाड.प्रदिप हणवते.सुनिल जाधव.रवि कोकरे.शेषेराव वाघमारे.नागनाथ कामजळगे.सय्यद आरिफ सय्यद अली.अतीख हुसेन.भोजराज शिंदे.कार्तिक भरतीपुरम किरणकुमार न्यालापल्ली.राजु इराबत्तीन. शहाबाज सलीम पठाण.नागेश निरडी.ढगे.अजय गोरे.गुलाबराव पंडीत.भाग्यश्री नागेश्वर.कल्पना सत्ते आणि सविता गवते उपस्थित होते.

# सेवा,सामाजिक कार्य आणि संस्कृतीचे प्रतीक

लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे हे महाराष्ट्रातील एक सुप्रसिद्ध धार्मिक व सामाजिक संस्था आहे. गणेश भक्तांसाठी हे मंदिर श्रद्धेचे केंद्र आहे आणि दरवर्षी येथे लाखो भक्त गणरायाचे दर्शन घेतात. १८९३ साली लोकमान्य टिळक यांच्या प्रेरणेने स्थापन झालेला हा गणपती उत्सव आज पुण्याच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. मंदिराच्या स्थापनेपासून ट्रस्टने केवळ गणेशभक्तीच नव्हे, तर समाजसेवा, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि आपत्ती निवारण यासारख्या विविध सामाजिक कार्यांमध्ये मोलाची भूमिका बजावली आहे.

ट्रस्टची वाटचाल – सेवा आणि सामाजिक कार्य:

१) गणेश उत्सव (स्थापना – १८९३):.श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या प्रतिष्ठापनेला १८९३ साली प्रारंभ झाला. हा गणेशोत्सव केवळ धार्मिक सण न राहता लोकांना संघटित करणारे आंदोलन ठरले. या उत्सवाच्या माध्यमातून धार्मिकता आणि सामाजिक जागृती यांचा उत्कृष्ट संगम साधला गेला.

२) गणेश मंदिर: मंगलमूर्ती गणरायाचे भव्य विलोभनीय मंदिर पुण्यातील बुधवार पेठ येथे, फरासखाना पोलिस स्टेशनजवळ स्थित आहे. मंदिरातील श्री गणेशाची मूर्ती अत्यंत देखणी आणि भक्तांसाठी श्रद्धेचे केंद्र आहे.

३) बाल संगोपन केंद्र: ट्रस्टने समाजातील दुर्बल घटकांसाठी बाल संगोपन केंद्र सुरू केले आहे. देवदासींच्या निराधार आणि निराश्रित १०० बालकांसाठी कोढव्यामध्ये विनामूल्य शिक्षण, भोजन, निवास, समुपदेशन आणि संस्कार वर्ग चालवले जातात. तसेच, कागद, काच आणि पत्रा वेचणाऱ्या महिलांच्या २५ मुलांचे पालकत्व ट्रस्टने स्वीकारले आहे.

४) गणपती नगर: सिंहगड रस्त्यावर वीटभट्टी कामगारांच्या १०० कुटुंबांसाठी ट्रस्टने घरे बांधली आहेत. यामुळे त्यांना स्थिर निवास आणि चांगल्या जीवनशैलीसाठी मदत झाली आहे.

५) सुवर्णयुग सहकारी बँक:.सामाजिक आणि आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने १९७३ साली ही बँक स्थापन झाली. ती गरजू नागरिकांना आर्थिक सहाय्य पुरवते.

६) 'जय गणेश' रुग्णसेवा अभियान: ट्रस्ट ससून रुग्णालयातील ३००० रुग्णांना दररोज दोन वेळचे भोजन, चहा आणि नाश्त्याची सुविधा पुरवते. याशिवाय, दाखल रुग्णांच्या नातेवाईकांसाठी तात्पुरते विश्रांतीगृह आणि अल्प दरात भोजनाची सोय करण्यात आली आहे.

७) 'जय गणेश' ज्ञानवर्धन अभियान: पुणे शहरातील प्रतिकूल परिस्थितीत असलेल्या ५५० गुणवंत विद्यार्थ्यांसाठी ही योजना राबवली जाते. शालेय साहित्य, फी, संस्कार वर्ग, समुपदेशन, मोफत वैद्यकीय सेवा आणि विमा संरक्षणाचा यात समावेश आहे.

८) 'जय गणेश' स्वयंपूर्ण ग्राम अभियान: पुरंदर तालुक्यातील पिंगोरी गाव स्वयंपूर्ण करण्यासाठी ट्रस्ट विविध प्रकल्प राबवत आहे. धरणातील गाळ काढणे, वृक्षारोपण, गोशाळा, ठिबक सिंचन, वीज निर्मिती आणि ॲग्रो टूरिझम यासारखे उपक्रम



यामध्ये आहेत.

९) 'जय गणेश' आपत्ती निवारण अभियान: ट्रस्टने इंदापूर तालुक्यातील निमगाव केतकी येथील गारपीटग्रस्त १२ शेतकऱ्यांना ३०० चौ. फूट पक्की घरे बांधून दिली आहेत.

१०) 'जय गणेश' निसर्ग संवर्धन अभियान: ट्रस्टने महाराष्ट्रातील वारी मार्ग, अष्टविनायक मार्ग आणि प्रमुख महामार्गावर ५० लाख झाडे लावण्याचा संकल्प केला आहे.

११) 'जय गणेश' जल संवर्धन अभियान:.खडकवासला धरणातील गाळ काढण्यासाठी ट्रस्टने पुण्यातील ५०० गणेश मंडळांना एकत्र आणले.

१२) वैद्यकीय सेवा: विद्यार्थी आणि नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, दंतचिकित्सा, नेत्रचिकित्सा, शस्त्रक्रिया आणि औषधे दिली जातात.

१३) मोफत रुग्णवाहिका सेवा: पुणे महानगरपालिका हद्दीतील रुग्णांसाठी विनामूल्य तर हद्दीबाहेरील भागांसाठी फक्त डिझेल खर्चात रुग्णवाहिका सेवा दिली जाते.

१४) 'जय गणेश' कुष्ठरोगी पुनर्वसन अभियान: येवलेवाडी येथे कुष्ठरोग्यांसाठी औद्योगिक कारखान्याच्या पुनर्बांधणीसाठी ट्रस्टने ६० लाख रुपये मदत केली आहे.

१५) ई–लर्निंग सुविधा: पुणे जिल्ह्यातील ६५ ग्रामीण शाळांमध्ये ई–लर्निंग प्रकल्प राबवला जात आहे, ज्यामुळे २५,००० विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणात मदत मिळते.

१६) शुद्ध पाण्याची व्यवस्था: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी जागतिक पेटंट असलेली शुद्ध पाणी यंत्रणा २६ शाळांमध्ये बसवण्यात आली आहे.

१७) व्होकेशनल ज्युनियर कॉलेज: कोंढव्यात औद्योगिक कौशल्य वाढवण्यासाठी ११वी आणि १२वी साठी व्होकेशनल ज्युनियर कॉलेज सुरू करण्यात आले आहे.

१८) वृद्धाश्रम: कोंढवा येथे वृद्धांसाठी भोजन, निवास, वैद्यकीय तपासणी आणि मनोरंजनाची सोय आहे.

१९) औद्योगिक प्रशिक्षण केंद्र: ग्रामीण बेरोजगार तरुणांसाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र चालवले जाते.

२०) वारकरी सेवा: आषाढी वारीमध्ये वारकऱ्यांसाठी फिरते रुग्णालय, मोफत औषधोपचार आणि नेत्र तपासणी सेवा दिली जाते.

२१) आपत्कालीन मदत: पूर, भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीवेळी ट्रस्ट मदत पुरवते.

२२) संगीत महोत्सव: प्रसिद्ध गायक आणि नर्तक यांचा वार्षिक संगीत महोत्सव आयोजित केला जातो.

२३) महिला सक्षमीकरण: अंध, अपंग, विधवा आणि परित्यक्त महिलांसाठी लघुउद्योग सुरू करण्यात आले आहेत.

२४) राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा: गणेशोत्सवाला विधायक आणि रचनात्मक वळण देण्यासाठी राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा घेतली जाते.

२५) मंदिर आणि परिसर विमा संरक्षण: मंदिर आणि नागरिकांच्या संरक्षणासाठी वार्षिक ५ कोटींच्या विम्याचे संरक्षण दिले जाते.

एकुणच, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट केवळ एक धार्मिक संस्था नसून संपूर्ण समाजसेवेच्या महान कार्यात योगदान देणारी संस्था आहे. भक्ती, सेवा, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि आपत्ती निवारण यामध्ये त्यांनी घेतलेले पुढाकार समाजासाठी प्रेरणादायी आहेत. गणेशभक्तांसाठी हे मंदिर श्रद्धेचे स्थान आहे आणि ट्रस्टच्या विविध उपक्रमांमुळे समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत मदत पोहोचते.ही सर्व माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुहास रासने यांनी यावेळी दिली.

**–डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष वंजारी महासंघ महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य**



**मॅप्रो फूड प्रॉडक्ट लिमिटेड कंपनी वाई सिरुर येथे नायगाव विधानसभा मतदारसंघातील लोक कल्याणकारी शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी व यांचे जावई उत्कर्ष पाटील जाधव यांनी सदिच्छा भेट घेतली व मॅप्रो कंपनीचे सी.ई.ओ मयूर ओरा सर यांचा व्हीपीके उद्योग समूहातील खानसरी साखर व जागरी पावडर भेट देऊन त्यांचा सन्मान केला यावेळी ऋषिकेश चव्हाण सर (सि.ओ.ओ.) उपस्थित होते.(लोकनेता न्युज नेटवर्क)**

## विलास गायकवाड पोलीस पाटील यांना पितृशोक

लोकनेता न्यूज नेटवर्क **आंबुलगा । प्रतिनिधी**



कळका येथील कै.रामजी गंगाराम पाटील गायकवाड यांचे दि.२८ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार रोजी दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी दुःखद निधन झाले असून ते कळका नगरीचे पोलिस पाटील श्री.विलास पाटील गायकवाड यांचे वडील आहेत.त्यांची कष्टकरी शेतकरी म्हणून ख्याती होती. तसेच सामाजिक कार्यकर्ते मारोती पाटील गायकवाड यांचे ते वडील होत.त्यांच्या पाठीमागे पत्नी, दोन मुले व दोन सुना नातू नाती , पणतू आहेत.त्यांचावर सायंकाळी ६ वाजता कळका ता कंधार जि नांदेड येथील समशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. शोकाकुल समस्त गायकवाड पाटील परीवार कळका ता कंधार जि नांदेड.



**भायेगाव येथिल महादेव मंदिराच्या रस्त्यासाठी ४० लाख रुपयांच्या कामाचे भुमीपुजन नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आ. आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**

## बामणी येथे गट विकास अधिकारी दत्तात्रय कदम यांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलाचे भूमिपूजन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

अर्धापूर तालुक्यातील बामणी या गावात प्रधानमंत्री घरकुल योजना टप्पा दोन चे ३२ घरकुल मंजूर झाले आहेत शुक्रवारी बामणी येथे तालुका अर्धापूर येथील गट विकास अधिकारी श्री दत्तात्रय कदम यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले आहे

प्रधानमंत्री योजना ग्रामीण टप्पा दोन सन २०२४ ते २०२५ बामणी या गावांमध्ये ३२ घरकुल मंजूर करण्यात आले आहे सर्व घरकुल लाभार्थी यांना १५ हजार बँक खात्यात जमा करण्यात आले आहे तात्काळ घरकुलाचे काम सुरू करण्याचे आदेश गटविकास अधिकारी दत्तात्रय कदम यांनी माहिती दिली आहे त्यांच्या हस्ते घरकुल बांधकाम करण्यास सुरुवात केली आहे त्यावेळी पंचायत समिती विस्तार अधिकारी श्री मुंडकर साहेब शिरफुले साहेब सो पल्लवी सोनवणे मॅडम ग्रामसेवक ग्रामपंचायतचे सरपंच सो शिल्पा साहेबराव कदम उपसरपंच मनकर्णा मालोजी चिंतले ग्रामपंचायत चे मेंबर गावातील काही मंडळी पांडुरंग कदम सुनील कदम मारुती कदम साहेबराव कदम सुनील कदम देवराव कदम संदीप कदम लिंगोजी चिंतले उपस्थित होते.



**डॉ.श्रद्धा पुयेड पाटील यांची मेडिकल ऑफिसर म्हणून किनवट येथे नियुक्ती झाल्याबद्दल नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांनी सत्कार करून पुढील भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**

## पोलिस अधिक्षक साहेब सदरक्षणाय कि पवनचक्की रक्षणाय ? शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांकडून खोटा गुन्हा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी सौर ऊर्जा प्रकल्प व पवन ऊर्जा प्रकल्पाच्या कामकाजाच्या संबंधाने स्थानिक राजकीय पुढारी, स्थानिक शेतकरी व गावगुंड यांच्याकडून विविध कारणांसाठी होणारी अडवणूक करून कामकाज बंद पाडणे किंवा खंडणीची मागणी करणे या अनुषंगाने प्रकल्पातील अशा होणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती केली आहे. मात्र पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक व दडपशाही याविरोधात शेतकऱ्यांनी शासन दरबारी लेखी तक्रार करून दाद मागण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात. जिल्हा प्रशासन त्यांची बाजु मुळात ऐकुनच घेत नाही. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बाबतीत बालाघाटावर अशा घटना घडलेल्या आहेत. यातच बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांवर पवनचक्की कंपन्यांनी खोटा गुन्हा दाखल केला असुन त्यांना न्याय कधी मिळणार?? पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांचीच केवळ पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.सौर ऊर्जा प्लेट टाकणार सांगुन रात्रीतुन पवनचक्की उभारली ; अडवायचा प्रयत्न केला असता गुन्हे दाखल केले

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील शेतकरी गणेश जगदाळे सांगतात आम्ही ७ जण भावंडे एकत्र कुटुंब पद्धतीत असुन आमच्या शेतालगत ९०० फुट अंतरावर फसवणूक करून पवनचक्की उभारण्यात आली आहे. अगोदर आम्हाला सौर ऊर्जा प्रकल्पाच्या प्लेटी लावणार असल्याचे सांगण्यात आले.नंतर रात्रीतुन मोठमोठ्या वाहनातुन पवनचक्की साहित्य आणण्यात आले.आम्ही अडवण्याचा प्रयत्न केला असता आमच्यावर पोलिस प्रशासनाकडून गुन्हे दाखल करण्यात आले. पवनचक्की कंपन्यांच्या कापर



तारांमुळे जमिनीतील पाण्याची पातळी घटली. आमच्या शेतात सध्या शंभरच्या वर दुधदुभते जनावरे आहेत. पवनचक्की सुरू झाल्यावर आम्हाला सगळं सोडून जायची पाळी येणार आहे. आम्हाला सन २०१३ मध्ये महाराष्ट्र शासन कृषी व पणन विभाग सन्मानपत्र वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार मिळालेला आहे.गेल्या महिन्यात १३ जानेवारी दरम्यान बीड जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी असणाऱ्या ७ जणांना पुणे येथे नेण्यात आले होते.त्यात आमचा समावेश होता. मात्र पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे आम्ही अडचणीत आलो असुन जिल्हा प्रशासन व न्यायालयात दाद मागत आहोत. आम्हाला न्याय कधी मिळणार??

जिल्हास्तरीय व उपविभागीय स्तरीय संनियंत्रण समित्या कागदावर ; पिडीत शेतकऱ्यांना वाली कोण? त्यांना न्याय कोण देणार

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्यांची स्थापना केलेली आहे. या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पाचे निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे पवन ऊर्जा प्रकल्प बाबत समितीकडे आलेल्या तक्रारीची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाचे अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे. त्याचप्रमाणे शेतजमीन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासात यांच्यामध्ये समन्वय ठेवणे. प्रकल्प उभारणीसाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावर सर्व प्रकारचे सहकारी सहाय्य करणे इत्यादी अधिकार त्यांना दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे तालुका स्तरावर सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार समन्वयक अथवा सचिव आहेत .मात्र या समित्या केवळ कागदावर असून पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. असे असतानाच पोलीस अधीक्षक बीड यांनी पवनचक्की व सौर ऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांची पाठराखण करणे म्हणजे एक प्रकारे त्यांच्या मनमानी कारभाराला दिलेले सूट असून पिडीत शेतकऱ्यांना न्याय कोण देणार?

# कर्मचाऱ्यांच्या कर्तव्याप्रती प्रामाणिकपणामुळे संस्था नावारूपाला आली-रणवीर पंडित

## जयभवानीत शिक्षक देवीदास गिरी आणि सुधाकर देशमुख यांचा सेवापुर्ती समारंभ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**





जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांची मेहनत, कर्तव्यप्रती प्रामाणिकपणा यामुळे संस्था नावारूपाला आली. संस्थेअंतर्गत घेतलेल्या क्रीडा महोत्सवात क्रीडा शिक्षकांनी उत्कृष्ट काम केल्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडू घडू शकले. क्रीडा शिक्षक देविदास गिरी सरांनी देखील आपल्या कार्यकाळात मैदानाशी नाते जोडले आणि त्यामुळे या भागातील मुलांना क्रीडा क्षेत्रात नाव कमविण्यासाठी संधी मिळाली. ज्येष्ठ शिक्षक सुधाकर देशमुख यांनी देखील अध्यापनाबरोबरच संस्थेच्या वेगळ्या वेगवेगळ्या कामात पुढाकार घेतला. या सर्व कर्मचाऱ्यांचेसंस्थेसोबतच शिवछत्र परिवारासी घनिष्ठ नाते आहे, त्यांच्या ऋणात आम्ही कायम आहोत असे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. जयभवानी विद्यालयातीलदेवीदास गिरी, जेष्ठ शिक्षक सुधाकर देशमुख यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

शिवाजीनगर गढी येथील जयभवानी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयातील क्रीडा शिक्षक देविदास गिरी आणि ज्येष्ठ शिक्षक सुधाकर देशमुख हे आज नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, उद्योजक सतीश देशमुख, जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सह प्रशासन अधिकारी प्रा. काशिनाथ गोगुले, मुख्याध्यापक वसंत राठोड, माजी प्राचार्य डॉ. शौकत पटेल, प्राचार्य भास्कर घाडगे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देविदास गिरी आणि सुधाकर देशमुख यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना देवीदास गिरी आणि सुधाकर देशमुख म्हणाले की, आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित यांच्यामुळे आमच्या जीवनाचे चीज झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अध्यापना सोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम केले. कर्मचाऱ्यांना आपलेसे करणारा शिवछत्र परिवार कायम आमच्या पाठीशी आहे. यापुढील काळातही शिवछत्र परिवाराशी आम्ही कायम एकनिष्ठ राहू असे भावनिक मनोगत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी सभापती मुजीब पठाण, विद्यार्थी कु. ज्योती तागड, किशोरी बारगजे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रणजीत बडे यांनी करुन उपस्थितांचे आभार महेंद्र देशमुख यांनी मानले कार्यक्रमाला क्रीडा शिक्षक देविदास गिरी यांच्या सौभाग्यवती रेखा गिरी यांच्यासह संदीप गोसावी, रवी गिरी डॉ. प्रशांत गिरी, श्रीकांत गिरी तसेच ज्येष्ठ शिक्षक सुधाकर देशमुख यांच्या सौभाग्यवती रेखा देशमुख यांच्यासह सुरज देशमुख, शुभम देशमुख यांच्यासह सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंळदी येथील जलजीवन मिशन योजनेच्या कामाची चौकशी करा-गोविंद मुदगुरे

## पाणी पुरवठा विभागाकडे मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**



बिलोली तालुक्यातील आंळदी येथील जलजीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या पाइपलाइनचे काम अंत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असुन कामाची तात्काळ चौकशी करण्याची मागणी आंळदी येथील सामाजिक कार्यकर्ते गोंविद मुदगूरे यांनी बिलोली येथील पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता यांच्याकडे २७जानेवारी रोजी केली

केंद्र सरकारची अंत्यंत महत्त्वपुर्ण समजली जाणारी जलजिवन मिशन योजनेंतर्गत ग्रामीण भागात घर तेथे नळ संपूर्ण महाराष्ट्रात केली जात आहे परंतु आंळदी येथील जलजिवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठ्याचे काम अंत्यंत निकृष्ट दर्जाचे होत आहे . हे काम व्यापक्रास कंपनी करत आहे सदर कंपनी शासनाच्या अंदाजपत्रकानूसार न करता पाइपलाइन चे खोदकाम दीड ते दोन फुटांपर्यंत खोल करत आहे पाईप सूध्दा कमी दर्जाचे वापरत आहे कामाबद्दल गूत्तेदार व पाणी पुरवठा विभागाचे अभियंता श्री विठ्ठलवाड यांच्याकडे माहीती दीली परंतु आजपर्यंत या कडे लक्ष न देता काम बरोबर असल्याची मुकसंमती असल्याचे दीसते त्यामुळे संबंधीत गूत्तेदाराची चौकशी करण्याची मागणी आंळदी येथील सामाजिक कार्यकर्ते गोंविद मुदगूरे यांनी निवेदनाद्वारे उप अभियंता यांच्याकडे केली आहे.

# शिव फुले शाहू आंबेडकर विद्यार्थी हक्क समिती नांदेडच्या वतीने सामाजिक न्याय मंत्र्यांना निवेदन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**



राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या काही मागण्यांच्या अनुषंगाने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना व भारत सरकार शिष्यवृत्ती योजना मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राबवली जाते या दोन्ही योजना विद्यार्थी लाभ घेत असताना त्यांना बऱ्याच अडचणी सामोरे जावे लागत आहे त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील शिव फुले शाहू आंबेडकर विद्यार्थी हा समिती यांच्या वतीने वारंवार निवेदन देऊन पाठपुरावा करून देखील त्या मागण्या मागण्यांचे गांभीर्याने दखल घेतली जात नाही नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक व गुणवंतवाडीमुळे महाराष्ट्र राज्यातील हिंगोली परभणी यवतमाळ लातूर या जिल्ह्यातील विद्यार्थी शिक्षण घेत असताना त्या डॉक्टर बाबासाहेब स्वाधार योजना जिल्हाभरातून जवळपास दहा ते बारा हजार विद्यार्थ्यांचे अर्ज करत असतात म्हणून नांदेड जिल्ह्यामध्ये दरवर्षी या योजनेसाठी निधीची कमतरता भासत आहे आपण या विषयाची सखोल माहिती घेऊन नांदेड जिल्ह्यातील वाढविणे देऊन विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा या मागणीसाठी शिव फुले शाहू आंबेडकर विद्यार्थी हक्क समिती नांदेड यांच्यावतीने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२३ २४ या शैक्षणिक वर्षातील प्रलंबित रक्कम तात्काळ विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे व शैक्षणिक वर्ष २०२४ पंचवीस शैक्षणिक वर्षातील स्वाधार योजनेसाठी वस्ती ग्राहक अर्ज केला तरच स्वतः मिळणार असे टाकून विद्यार्थ्यांना वस्ती करासाठी अर्ज करणे बंधनकारक केले परंतु नंतर स्वाधार योजनेची जाहिरात काढून स्वाधार साठी अर्ज करा अशी जाहिरात करण्यात आल्याच्या विद्यार्थ्यांनी वस्तीगृहासाठी अर्ज केला अशा विद्यार्थ्यांना स्वाधारचा अर्ज करता आलेला नाही अशा विद्यार्थ्यांना सरसकट पात्र करून स्वतःचा लाभ देण्यात यावा भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेला पीडीएफ प्रणालीतून वगळण्यात यावे भारत सरकार शिष्यवृत्ती व स्वाधार शिष्यवृत्ती रकमेत महागाई भत्तेनुसार वाढ करण्यात यावी तालुकास्तरीय स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्याची तारीख वाढवून देण्यात यावी दहावीला पन्नास टक्के ची जाचकट रद्द करण्यात यावी ज्या वेबसाईटवर विद्यार्थी पास होतो त्याच बेसिसवर विद्यार्थ्यांना स्वतःचा लाभ देण्यात यावा अशी विद्यार्थी संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय क्षिरसाट यांना निवेदन दिले आहे यावेळी अक्षयकुमार गायकवाड, प्रबुद्ध काळे, रोहित आढाव ,श्रीकांत चव्हाण, अमोल पटेकर, निखिल महाबळे, आदींची उपस्थिती होती

## सावळी येथील देवकरे कुटुंबाला आर्थिक मदत

# सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा.यशवंत गोसावी यांनी मौ.सावळी व मिनकी येथे केली आर्थिक मदत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**



बिलोली तालुक्यातील मौजे सावळी येथे दि २७ फेब्रुवारी च्या मध्यरात्री शेतकरी राहुल देवकरे वय ३० वर्षे याचा तंबाखू भट्टीमध्ये पडून मृत्यू झाल्याची घटना २७ फेब्रुवारी रोजी घडली. त्या दुःखद कुटुंबास काल दि २८ फेब्रुवारी रोजी समाजसेवक तथा सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांनी तात्काळ भेट देऊन त्या परिवारांचे सांत्वन करीत आर्थिक मदत केली व त्या कुटुंबातील लहान मुलांचे शालेय शिक्षणाची जबाबदारी स्वीकारले.

याबरोबरच मिनकी येथील पैलवार कुटुंबाचे भेट घेऊन त्यांनाही आर्थिक मदत केले. यावेळी सुप्रसिद्ध व्याख्याते नाशिक येथील प्राध्यापक यशवंत गोसावी यांच्यासह समाजसेवक राजू पाटील शिंपाळकर, माजी उपनगराध्यक्ष शंकररावजी मावलगे, समाजसेवक सय्यद रियाज, डॉ. लक्ष्मीकांत कलमुर्गे गजानन पाटील पवार तसेच गावातील शंकर सावळीकर ,मिनकी येथील सोसायटी चेअरमन शंकरराव बिरादार, शिवानंद स्वामी यांच्यासह देवकरे व पैलवार कुटुंबातील व्यक्ती उपस्थित होते.

# उत्कृष्ट कार्याने पुणे विभागाचे आयुक्त डॉ.पुलकुंडवार यांचा झाला गौरव!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार मन्याड खोऱ्यातील मातीत म्हणजे कंधार तालुक्यातील चळवळीची अन् शैक्षणिक क्रांतीच्या बहाद्दरपूरा, नगरीत सुलोचना अन् लक्ष्मणराव पुलकुंडवार यांच्या उदरी जन्मास आले.त्यांचे शिक्षण बहाद्दरपूरा,कंधार, नांदेड, परभणी अशा ठिकाणी घेत अधिकारी पदापर्यंत पोहोचवून कंधारचे नाव राज्य पातळीवर झुकवून चमकले.हा कर्तव्य दक्ष अधिकारी सध्याला महसुलायुक्त पुणे मा. चंद्रकांतजी लक्ष्मणराव पुलकुंडवार यांनी व त्यांच्या सहकार्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल डॉ.चंद्रकांतजी पुलकुंडवार विभागीय आयुक्त पुणे यांचे व सर्व सहकारी बंधु-भगीनींचे मनःपुर्वक अभिनंदन!

मा. ना. देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांनी १०० दिवसांच्या कार्यक्रम पत्रिकेतील उपक्रमांची प्रभावी आंमबजावणी करण्यात येणाऱ्या राज्यपातळी वरील स्पर्धेत आपण विभागिय आयुक्त पुणे विभाग या भूमिकेत शासनाच्या सर्व योजना यशस्वी पणे राबविण्यात अव्वल ठरल्याबद्दल व आपण आय ए एस च्या सेवाकाळातील आपले विक्रम करण्याची श्रृंखला कायम ठेवून आपल्यातील प्रशासकीय गुणवत्ता परत विभागिय आयुक्त म्हणून सुद्धा सिद्ध व यशस्वी केल्याची पताका पुन्हा राज्य पातळीवर फडकत मन्याड खोऱ्याचा ठसा राज्यस्तरीय उमटविला.त्याबद्दल मा.ना.देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री महोदयांच्या समर्थ हस्ते व स्वाक्षरीने सन्मानाचे प्रशस्तीपत्र व सन्मान प्रदान करुन कार्यप्रणालीत अन् गुणवत्तेचा गौरव झाला. कंधार तालुक्यातील मन्याड धडीच्या बहाद्दरपूरा नगरीचे, कुटुंबांचे व समाजाचे आणि नांदेड जिल्ह्याचे नाव राज्यभर लक्षवेधी ठरवले! या कतृत्वा बद्दल मा.चंद्रकांतजी पुलकुंडवार व सहकारी बंधु-भगीनींचे अभिनंदन!या यशाबद्दल मन्याड खोऱ्यातील जनता-जनार्धन त्यांचे कौतुक करत आहेत.

# गरिबांचा फ्रिज वाघोली बाजारात दाखल

लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असल्याने थंड पाणी पिल्याशिवाय ताणही भागत नाही. माठातलं थंडगार पाणी पिणे सर्वांनाच आवडतं. सर्वसामान्यांना परवडेल असा माठ बाजारामध्ये किंवा शहरात विक्रीस आलेले आहेत. खेडेगावात कुंभार बंधू वारुळाची माती, राख, पाणी ईत्यादि साहित्याचा चिखल बनवून त्यांच्याकडे असलेल्या गोलाकार चाकावर चिखलाच्या गोळ्याला हवा तसा गोलाकार हाकार देउन अन् वाळवत असतो. वाळलेल्या माठाला भट्टीमध्ये भाजून घेत असतो. अनेक काळापासून माणूस थंड पाणी पिण्याचे साधन म्हणून माठाचा वापर करत आलाय.हळूहळू प्रगतशील तंत्रज्ञानाने फ्रिज ची निर्मिती झाल्या कारणाने माठांची संख्या कमी होत गेली. खेडेगावात माठ सहजतेने उपलब्ध होऊ शकतो पण शहरांमध्ये देखील सर्वसामान्यांना परवा परवडेल असा माठ उपलब्ध झाला आहे. सामान्यांना परवडेल अशा किंमतीत अगदी लहान आकारापासून ते मोठ्यापर्यंत ६० रूपया पासुन ते ४०० रूपया पर्यंत नक्षीकाम केलेले माठ देखील वाघोली येथील बाजार तळाच्या जवळ वीक्रिस आलेले आहेत. माठ विक्रेत्यांकडून फुटपाथ वर माठ ठेवण्याचा कर आकारला जातो. लोकनेता न्यूज नेटवर्क शी बोलताना विक्रेते म्हणाले की सध्या तेवढे ग्राहक येत नाहीत इथून पुढे येतील कधीकधी तो कर सुद्धा निघत नसल्याची खंत व्यक्त केली. जसा जसा उन्हाळा वाढत जाईल तशी तशी ग्राहकांची संख्या वाढेल अन् माठ विक्री होईल अशी आशा माठ विक्रेत्यांनी व्यक्त केली.



# पिंपळगाव येथील शिव महापुराण कथा व श्री १०८ कुंडी विश्वशांती दत्तयाग महायज्ञ सोहळ्याची तयारी पूर्णत्वाकडे

## खासदार नागेश पाटील आष्टीकर व प्रशासनाच्या वतीने आढावा बैठक संपन्न







लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

श्री शिव सद्गुरु शिवलिंग स्वामी दत्त संस्थान मठ तीर्थक्षेत्र पिंपळगाव तालुका हदगाव जि. नांदेड येथे दिनांक ६ मार्च २०२५ ते दिनांक १३ मार्च २०२५ दरम्यान आयोजित भव्य शिव महापुराण कथा व श्री १०८ कुंडी विश्वशांती दत्तयाग महायज्ञ व नाम संकीर्तन सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली असून दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी तिर्थक्षेत्र पिंपळगाव येथे प.पू.व्यंकट स्वामी महाराजांच्या मार्गदर्शना खाली व खासदार नागेश पाटील आष्टीकर, माजी आमदार माधवराव पाटील जळगावकर, अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी आमना मॅडम आदी प्रमुख अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली.

तिर्थक्षेत्र पिंपळगाव येथे भव्य शिव महापुराण कथा प्रसिद्ध प्रवक्ते अनंत श्रीविभूषित श्रीमज्ञगद्गुरु द्वाराचार्य श्री अग्नीपिठादीश्वर एवं मलूकपिठाधीश्वर स्वामी श्रीराजेंद्रदास देवाचार्यजी महाराज श्री रेवासा– वृंदावन धाम उत्तर प्रदेश यांच्या ओजस्वी वाणीतून संपन्न होणार आहे. या भव्यदिव्य अशा श्रीमद् भागवत कथेला संबंध जिल्ह्यातुन व महाराष्ट्रातून एक ते दीड लाखाच्या वर भाविक भक्तमंडळी व श्रोतेगण उपस्थित राहण्याची शक्यता आहे.त्याच बरोबर संपूर्ण भारतातून प्रसिद्ध साधुसंत,महंत,योगीजण,ऋषीगणवृंद यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहणार आहे.तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार व अनेक मंत्री गणांची व मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. तेव्हा येणाऱ्या मान्यवरांची व श्रुती मंडळींची अत्यंत चांगल्या रीतीने व्यवस्था होण्यासाठी करण्यात आलेल्या उपाय योजनेचा आढावा या बैठकीत मान्यवरांनी घेतला.यात प्रामुख्याने कथा ऐकण्यासाठी मोठ्या प्रमाणात येणाऱ्या पुरुष मंडळींना व महिलांना बसण्याची वेगवेगळी आसन व्यवस्था,पाणी व्यवस्था,भोजन व्यवस्था येणाऱ्या वाहनाची पार्किंग,लाईट व्यवस्था, मुक्कामी राहणाऱ्या मान्यवरांच्या निवासाची व्यवस्था,होणाऱ्या गर्दीत चेंगराचेंगरी होणार नाही यासाठी उत्तम अशी सुरक्षा व्यवस्था, आरोग्य व्यवस्था,टेहळणी साठी वॉच टावर उभारणे,रस्त्यांच्या दोन्ही बाजूला बॅरिकेट उभारणे,विविध ठिकाणी उत्तम स्पीकर व्यवस्था,संपूर्ण कार्यक्रमावर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्हीची व्यवस्था, तसेच येणारे व्हीआयपी मान्यवर यांचे हेलिकॉप्टर उतरण्यासाठी जवळच हेलिपॅडची व्यवस्था यासह करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनावर विविध मान्यवरांनी आपल्या सूचना मांडून यासाठी सर्वांनी कार्यरत राहण्याच्या सूचना करण्यात आल्या. यावेळी भोकर, हादगाव, हिमायतनगर,तामसा तालुक्यातील अनेक गावातील गावकऱ्यांनी घेतलेल्या जबाबदाऱ्या आम्ही प्रामाणिक पणाने पार पाडू असे आश्वासन महाराजांना व उपस्थित मान्यवरांना बोलताना दिले.तसेच ज्यांच्या ज्यांच्यावर जी जी जबाबदारी टाकण्यात आली त्या सर्व कमिट्यांचे प्रमुख व त्यांचे सहकारी यांनीही कार्यक्रमात उद्भवणाऱ्या अडीअडचणी विषयी आपली मते मांडून दिलेल्या जबाबदाऱ्या आम्ही प्राणपणाने यशस्वी पणे पार पाडू व हा आपल्या नांदेड जिल्ह्यात होणारा भव्य दिव्य धार्मिक कार्यक्रम यशस्वी करून दाखवू असा आत्मविश्वास व्यक्त केला. यावेळी नांदेड जिल्हा परिषदचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी,हादगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी,नायब तहसीलदार, तामसा येथील पोलीस निरीक्षक,महावितरणचे उपकार्यकारी अभियंता, विविध प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व तशेच विविध कार्यालयाचे अधिकारी व त्यांचा कर्मचारी वर्ग तसेच या पवित्र यज्ञकार्यात सेवा कार्य स्वीकारणाऱ्या परिसरातील सर्व गावातील प्रमुख मान्यवर व कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कविता हा भावनांचा अविष्कार व साहित्याचा आत्मा असते-राजन लाखे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

लेखकाच्या जीवनात प्रज्ञा, प्रतिभा, प्रगल्भता येते तेव्हा कविता घडते. कवीची दृष्टी विचारांच्या अपूर्व संगमासह चिंतन, मनन, भाष्य बघत असते. परमेश्वराने दोन डोळे व एक जीभ दिली याचा अर्थ निरीक्षण जास्त व बोलणे कमी पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक राजन लाखे यांनी केले. एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य द्वारा मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित ३६ व्या ऑनलाईन एकता काव्य संमेलनात ते उद्घाटक पदावरून बोलत होते. संमेलनाध्यक्ष पदी अहिल्यानगर येथील जेष्ठ साहित्यिक सुप्रसिद्ध लेखक प्रा.डॉ.चंद्रकांत पालवे हे होते. लाखे यांनी जम्मू येथून रसिक श्रोत्यांशी संवाद साधला.

एकताचे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, प्रदेश प्रवक्ता मल्हारी खेडकर, प्रदेश युवक सरचिटणीस बलराम मनिठे यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झालेल्या कविसंमेलनात माधवी देवळाणकर (कडी–गुजरात) यांनी 'पळस' कविता व 'पान कवळे' लावणी सादर करून माहोल बदलून टाकला. पाथर्डीचे एड.अजित ठोंबरे यांनी 'हुंडा' ही ज्वलंत सामाजिक विषयावरील रचना पेश करत रसिकांना अंतर्मुख केले. तद्नंतर धारूर जि.बीड येथील कवयित्री मिनाक्षी मुंडे यांच्या 'कुणबी' व 'वेलीवरची फुले' या रचनांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले तर त्यांची कन्या साक्षी हिने 'बलात्कार' ही कविता सादर करत महिलांवरील अत्याचाराला वाचा फोडली. आष्टी चा उमदा कवी अजय भराटे याने 'फणा' व 'ऊस तोडणारी माय' या कष्टकऱ्यांच्या जीवनावरील वास्तववादी रचना पेश करून वातावरणात गंभीरता आणली. पाथ्री जि.परभणी चे शेतकरी कवी विठ्ठल चव्हाण यांनी 'बाप' व 'कसं होईल देवा' या शेतीमातीशी निगडीत



कविता ऐकवून शेतकऱ्यांच्या वेदनांना वाचा फोडली तर शिरूर का.जि.बीड येथील ग्रामीण कवी हनुमंत काळे यांनी 'शेतकरी आत्महत्या' व 'शेतकरी बाप' या कास्तकारांच्या वेदना सांगणाऱ्या कविता पेश करत उपस्थितांना खिळवून ठेवले. परळी वैजीनाथ चे नामदेव गित्ते यांच्या 'माय' रचनेने श्रोते भारावून गेले. कविसंमेलनाध्यक्ष डॉ.पालवे यांची 'सुख झरतच असते' ही कविता दाद मिळवून गेली. अहिल्यानगर चे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त कवी डॉ.अमोल बागूल यांनी अडीच तास रंगलेल्या या काव्य संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन केले. त्यांच्या 'शेती नाशकाचे प्रयोग' या कवितेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. संमेलनाचे प्रस्ताविक एकता फाउंडेशन शेवगाव तालुकाध्यक्ष प्रदीप बोडखे यांनी तर आभार प्रदर्शन देवीदास शिंदे यांनी केले. यावेळी एकताचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, परभणी जिल्हा महानगरीय अध्यक्षा प्रा.शोभाताई घुंगरे, परभणी जिल्हा उपाध्यक्षा मेघा नांदखेडकर, युवती आघाडीच्या नेहा कुमावत, जालिंदर साळुंके, भागवत कंठाळे, मयुर गायकवाड, अशोक तिडके, सखाराम गोरे, शितल जाधव, सुमित्रा गित्ते, सुरेश शिंगरे, स्वाती कानडे, सॅम मेकाले, दिपक पाठक, आरती पवळ, सुरेश पवळ, बाबासाहेब नागरगोजे, संजय खताळ, सविता फड, शुभांगी गित्ते, अलका सपकाळ यांच्यासह राज्यभरातील रसिक श्रोते उपस्थित होते.

# पारध बुद्रुक येथे तीर्थजलाचे पूजन





लोकनेता न्यूज नेटवर्क

**पारध । रमेश जाधव**

अनुलोम अनुगामी लोकराज्य महा अभियान महाराष्ट्र राज्य अंतर्गत संस्थेचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या सूचनेनुसार तीर्थक्षेत्र प्रयागराज येथे संपन्न झालेल्या पवित्र कुंभमेळा येथून आलेल्या तीर्थजलाचे पारध बुद्रुक येथे पूजन करून भाविकांना तीर्थ वाटप करण्यात आले . गावातील शेकडो भक्तासमोर जल पूजन झाले या जल पूजनासाठी गावातील अकरा जोडपे पूजेसाठी बसले होते.विधीवत पूजा अर्चना करून नंतर पराशर ऋषी महाराज मंदिर येथे आरती करण्यात येऊन महाप्रसाद वाटप करण्यात आले.यावेळी भोकरदन /जाफराबाद विधानसभेचे भाग जनसेवक गजानन पिसे , वस्ती मित्र संतोष पाखरे,व महा कुंभ प्रयागराज दर्शन पूजेसाठी बसलेले ११ जोडपे तसेच माजी सभापती परमेश्वर पाटील लोखंडे ,आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक समाधान लोखंडे सर ,माजी सरपंच गणेश पाटील लोखंडे, सुरेश अल्हाट, शरद आबा देशमुख ,संजय नारायण लोखंडे, सुरेश देशमुख, आनंदा लोखंडे, ज्ञानेश्वर मोरे, समाधान लोखंडे, ज्ञानेश्वर आल्हाट ,जनार्दन लोखंडे ,डॉक्टर डहाके साहेब,शंकर लोखंडे, आत्माराम लोखंडे,तेजराव लोखंडे ,सुरज बोडखे , जनार्दन लोखंडे, प्रभाकर लोखंडे,हरिओम काटोले,पत्रकार रमेश जाधव, आनंदा लोखंडे, नामदेव लोखंडे, कृष्णा तेलंग्रे,कडुबा बेराड,शंकर तबडे, रंगनाथ अल्हाट, प्रकाश लोखंडे,सह मोठ्या संख्येने गावकरी,भाविक भक्तांची उपस्थिती होती.

# कंधार येथे तालुकास्तरीय पाककृती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद!

## तृणधान्य कडधान्य पासून बनलेल्या पदार्थाची उपस्थितांनी चाखली चव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

बदलत्या जिवनशैलीत जंकफुड खाण्याच्या सवयीमुळे आपल्या आहारातून पोष्टीक तृण धान्याचा वापर कमी होत चालला आहे.खरेतर तृणधान्याचा उपयोग रोजच्या उर्जेच्या गरजा भागविण्यासाठी होणे आवश्यक असल्यामुळे शालेय जीवनात तृणधान्य व त्याची पोष्टिकता यांचे महत्व कळावे म्हणून कंधार येथे शिक्षण विभागाच्या वतीने दि२८फेब्रुवारी रोजी गटसाधन केंद्र कंधार येथे तालुकास्तरीय पाककृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेत तालुक्यांतील जिल्हा परिषद शाळा व शालेय पोषण आहार पात्र खाजगी शाळेत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस,माता पालक,व नागरिकांनी सहभागी नोंदवला होता,शासन निर्णयाच्या अनुषंगाने तालुकास्तरीय पाककृती स्पर्धा दि.२८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११:०० वाजता ग.शि.अ कार्यालय कंधार येथे गटशिक्षण अधिकारी संजय येरमे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती,तर शालेय पोषण आहार अधिक्षक वर्ग–२ सुरेश जाधव पाटील यांनी सदरील स्पर्धचे नियोजन केले होते,या कार्यक्रमास पत्रकार मिर्झा जमीर बेग,शिक्षण तज्ञ आनंद तपासे, मुख्याध्यापक दिगांबर वाघमारे, मुख्याध्यापक जाधव,राजू बोरकर,शिवाजी पाटील डिकळे आदीसह पालकांची उपस्थिती होती,मोड आलेले कडधान्य, धिरडी,पापड,अंडापुलाव, ईडली,डोसा,नाचणी सत्त्व भाकरी,विविध प्रकारच्या चटणी,सालाड आदी रूचकर स्वादिष्ट पदर्थाची चव परीक्षकांनी चाखून गुणदान केले तसेच उपस्थितांनी या सर्व अन्नपदार्थ चव घेतली,

# गावातील ग्रामपंचायतला कर भरा आणि शासनाच्याअनेक योजनेचा लाभ घ्या

## सेनगाव गट विकास अधिकारी माधव कोकाटे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील वलाना येथे सरपंच डॉ देवानंद गोरे व ग्रामपंचायत अधिकारी नामदेव गाढवे यांनी एक दिवस गावकऱ्यासोबत कार्यक्रमाचे आयोजन वलाना येथे केले होते या कार्यक्रमाला उपस्थित सेनगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी माधव कोकाटे हे उपस्थित होते यावेळी माधव कोकाटे यांनी वलाना गावातील नागरिकांसमोर अनेक योजना विषयी माहिती सांगून चर्चा केली ग्रामपंचायतीला कर भरावा आणि शासनाच्याअनेक योजना आपल्या गावामध्ये राबवून घ्यावा असा संदेश दिला यामध्ये नळपट्टी ,घरपट्टी , लाईट पट्टी असे कर भरून प्रत्येक नागरिकांनी



आपल्या ग्रामपंचायतीला सहकार्य करावे असे आव्हान केले व शासनाच्या येणाऱ्या प्रत्येक योजना आपल्या गावामध्ये राबवाव्यात यासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली आहे तर सेनगाव तालुक्यातील वलाना येथे पहिल्यांदाच एक दिवस गावकऱ्यांसोबत या कार्यक्रम घेण्यात आला होता या कार्यक्रमासाठी सेनगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी माधव कोकाटे गटशिक्षण अधिकारी पांडुरंग गिरी सरपंच देवानंद गोरे ग्राम अधिकारी नामदेव गाढवे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते गावातील नागरिकांना व शेतकऱ्यांना गटविकास अधिकारी माधव कोकाटे यांनी माहिती दिली तर शिक्षण अधिकारी पांडुरंग गिरी यांनी शिक्षणाविषयी माहिती दिली तर गावाच्या विकासासाठी सरपंच देवानंद गोरे यांनी माहिती दिली होती या कार्यक्रमाला गावातील नागरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या तर बचत गटातील महिलांनी छोटे स्टॉल लावून उद्योग कसा करावा या संदर्भात माहिती दिली, आयुष्यमान भारत नोंदणी करण्यात आली, आरोग्याची तपासणी देखील करण्यात आली यावेळी नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला,

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904